ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

...येक बुधवारीं ...सिद्ध होतें.
...णीचे दर :
...र्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख ६ जानेवारी, १९५४ अंक १

## विविध माहिती

**कमी प्रतीच्या कोळशाचा उपयोग**—मद्रास राज्यांत द. अर्कॉटमध्यें कमी प्रतीचा कोळसा सांपडतो. ह्या कोळशाचा उपयोग कारखान्यांना होईल किंवा नाहीं अशी शंका व्यक्त करण्यांत येत असे. पण मद्रास राज्यांतील सहा कारखान्यांनीं ह्या कोळशाचा यशस्वी रीत्या उपयोग केल्याचें समजतें. त्यामुळें कारखान्यांच्या खर्चांत बचत होईल.

**६५ हिंदी रुपयांना १०० पाक रुपये**—शंभर पाकिस्तानी रुपयांना "१४० भारतीय रुपये" असा हुंडणावळीचा अधिकृत दर आहे. पण अमृतसरजवळ वाघ या सरहद्दीच्या ठिकाणीं कांहीं पाकिस्तानी नागरिकांनीं ६५ हिंदी रुपये घेऊन १०० पाकिस्तानी रुपये दिले असें कळतें. आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या बाजारांत पाकिस्तानची आर्थिक परिस्थिति खालावली असल्याची ही खूण आहे, असा अर्थ करण्यांत येत आहे.

**दावणगिरी येथें खेळांचा आखाडा**—म्हैसूर सरकारनें दावणगिरी येथें एक स्टेडिअम बांधण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी ५०,००० रुपये खर्च येईल. दावणगिरी नगरपालिकेनें सुमारें ३०,५०० चौरस फूट जागा दिली असून एका गिरणीनें २०,००० रुपये देणगीदाखल दिले आहेत. म्हैसूर विद्यापीठाला पॅव्हिलिअनची इमारत बांधण्याची विनंति करण्यांत आली आहे.

**चंद्रावरील सफरीविषयीं उत्सुकता**—अंतरिक्षांत प्रवास करून दुसऱ्या ग्रहावर सफर करण्याविषयीं ब्रिटनमध्यें अधिकाधिक लोक उत्साह दाखवीत आहेत. गेल्या वर्षीं अशा प्रकारच्या प्रवासास तयार असणाऱ्या लोकांची संख्या २० टक्क्यांनीं वाढली. २,४१९ लोक हा प्रवास करण्यास आतां केव्हांहि तयार आहेत.

**इस्पितळासाठीं ६०,००० रुपये**—विंध्य प्रदेश राज्यांत निरनिराळ्या जिल्ह्यांत आयुर्वेदीय दवाखाने काढण्यांत येणार आहेत, असें समजतें. राज्य सरकारनें ह्या कामासाठीं ६०,००० रुपये मंजूर केले आहेत. दवाखान्यांच्या तीन प्रती रहातील. अ वर्गाचे ४, ब वर्गाचे ४ व क वर्गाचे ५ दवाखाने काढण्यांत येतील.

**अगदीं स्वस्त मोटार**—ब्रिटिश मोटारींच्या कारखान्यांत एका नव्या कारखान्याची भर पडणार आहे. हा कारखाना ३०० पौंडांना छोटी मोटार विकत देणार आहे. ह्या किंमतींत खरेदीकराचा सुद्धा समावेश होईल. नव्या मोटारीची रस्त्यावरील चांचणीहि झाली आहे. ही छोटेखानी मोटार दर तासाला ५० मैल धांवूं शकेल व गॅलनमागें ५० मैल जाईल. गाडीचा सांगाडा मजबूत, पण वजनानें हलका करण्यांत आला आहे.

**नव्या कारखान्याची जागा**—भारत सरकार काढणार असलेल्या नव्या पोलादाच्या कारखान्याच्या जागेची पहाणी करण्यासाठीं जर्मन तज्ज्ञांचें मंडळ चालू महिन्यांत मध्य प्रदेशांत जाणार आहे. क्रुप अँड डिमॅग कंपनीशीं भारत सरकारनें कारखान्याबद्दल करार केलेला आहे.

**कुंभ मेळ्यासाठीं डबे पाहिजेत**—मुंबई ते मद्रास आणि दिल्ली ते मद्रास ह्यांच्या दरम्यान धांवणाऱ्या जनता एक्सप्रेस ह्या गाड्या तात्पुरत्या रद्द करण्यांत आल्या आहेत. अलाहाबाद येथें भरणाऱ्या कुंभ मेळ्याला जाणाऱ्या यात्रेकरूंची सोय करण्यासाठीं जादा डबे लागतील म्हणून असें करण्यांत आलें आहे. कुंभ मेळ्याला ५० लाख यात्रेकरू येतील असा अंदाज आहे.

**अर्थमंत्र्यांची सिडने येथील परिषद**—“कॉमनवेल्थ फिनॅन्स मिनिस्टर्स” ची परिषद सिडने येथें दि. ८ रोजीं सुरू होणार आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांचे अर्थमंत्री त्या परिषदेंत सर्वांनाच येणाऱ्या अडचणींचा विचार करतील.

**रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर?**—श्री. गगनविहारी मेहता ह्यांची रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून नेमणूक होणार असल्याची बातमी आहे. सध्या ते भारताचे अमेरिकेंतील वकील म्हणून काम करीत आहेत. त्यांची जागा बँकेचे आजी गव्हर्नर श्री. बी. रामराव हे घेतील.

**नावर कंपनीची पुणें येथें कचेरी**—आर. आर. नावर आणि कंपनी ह्या सुप्रसिद्ध स्टॉक ब्रोकर्सच्या फर्मनें पुणें येथें आपली एक कचेरी महाराष्ट्र बँकेच्या इमारतींत उघडली आहे. गेल्या आठवड्यांत तिच्या उद्घाटनाचे वेळीं निमंत्रितांना पानसुपारी देण्यांत आली, त्यावेळीं फर्मचे मालक श्री. वर्दे हे उपस्थित होते.

**मक्का-मदिनाला आगगाडीनें जातां येईल**—मक्का आणि मदिना ह्या शहरांना जाण्यासाठीं रेल्वे-रस्ता तयार करण्याची योजना आखण्यांत येत आहे.

**अमेरिकेची लोकसंख्या**—१ जानेवारी, १९५४ रोजीं अमेरिकेची लोकसंख्या १६,१२,००,००० होती, असा यु. स्टे. सेन्सस ब्यूरोनें अंदाज प्रसिद्ध केला आहे. एका वर्षापूर्वीपेक्षा लोकसंख्या २७,००,००० नें वाढली आहे.

**खतांचा पुरवठा भरपूर आहे**—कृत्रिम खतांची मागणी पुरी पडण्यास पुरेसे साठे राज्य सरकारांच्या डेपोंत आहेत व मध्यवर्ती सरकारचे मुंबई व सिंद्री येथें भरपूर साठे आहेत, असें भारत सरकारनें जाहीर केलें आहे.

**मुंबई राज्यांत पंचवार्षिक योजना**—ह्या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद प्रसिद्ध झाला आहे. त्या पुस्तकाची पृष्ठसंख्या ३१२ असून त्यांत अनेक चित्रें, नकाशे, तक्ते, वगैरे आहेत. पुस्तकाची किंमत फक्त ४ आणे आहे.


## ऋण आणि क्षण

( ले. व प्रकाशक श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ' दुर्गाविलास, पुणें ४, पृष्ठें १६८, मूल्य रु. २ )

'अर्थ' या साप्ताहिकाचे विद्वान संपादक श्री. काळे यांनीं कित्येक मासिकांत लिहिलेले एकंदर ३० लेख या पुस्तकांत संग्रहित करून समाजऋण फेडण्याचा अभिनंदनीय प्रयत्न केला आहे. कारण परिपक्व अनुभव आणि विचार यांच्या आधारें तरूण पिढीला निरामय मार्गदर्शन करण्याचें काम त्यांनीं फार आस्थापूर्वक बजावलें आहे. त्यांच्या या लेखांतील मार्गदर्शनाचा विशेष हा कीं, फार उच्च, उदात्त किंवा अव्यवहार्य पातळीवर जाऊन तरुणांना बोधामृत पाजण्याचा त्यांचा खटाटोप नाहीं. सध्यां साधारणतः मध्यमवर्गीय स्त्री–पुरुषासमोर व सांसारिकासमोर जे दैनंदिन, सामाजिक आणि आर्थिक प्रश्न असतात, त्यांचाच विचार त्यांनीं प्रामुख्यानें केला आहे. हा विचारहि अत्यंत सहृदयतेनें, तरुण–तरुणींची संसारांतील आकांक्षा, त्यांची आर्थिक परिस्थिति, त्यांची मानसिक भूमिका व आधुनिक जीवनप्रणालीचा त्यांच्यावरील संभाव्य परिणाम ध्यानांत घेऊन केलेला आहे. अडचणी व आपत्ति तर चुकत नाहींतच, पण त्यांतहि जीवनांत सुख कसें निर्माण करावें, याची श्री. काळे यांनीं केलेली चर्चा विचारांना चालना देणारी ठरेल. दररोजच्या लहानमोठ्या अनेक गोष्टींत वास्तविक सुखाचे कण असतात. पण आपण त्याची उपेक्षा करतों. क्षुल्लक गोष्टींतूनहि आनंदाचा मध शोषून घेण्याची व तशी आपल्या स्वभावाची घडण बनविण्याची जी मार्मिक शिकवण या पुस्तकांतील बहुतेक लेखांत आहे, तिला अनुसरूनच 'सुखी जीवनाच्या पाऊलवाटा' असें अभिधान लेखकानें या लेखांना दिलें असावें.

संसार करीत असलेल्या किंवा संसारांत पडूं इच्छिणाऱ्या स्त्री–पुरुषांना या पुस्तकाचें वाचन म्हणजे एखाद्या मित्रानें जिव्हाळ्यानें केलेल्या गुजगोष्टींसारखें वाटेल. श्री. काळे यांनीं जें कांहीं सांगितलें आहे, तें फारसें नवीन नाहीं. पण त्यांचें निवेदन अनेक उदाहरणांनीं परिपूर्ण, आत्मीयतेनें भरलेलें, खुसखुशीत, मनोरंजक, व्यावहारिक आणि सडेतोड आहे. नव्याजुन्याच्या या संधिकाळांत घरोघर व समाजांत अनिष्ट संघर्ष टाळण्याच्या दृष्टीनेंहि या पुस्तकांतील मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. हें पुस्तक वाचत असतां, आत्मनिरीक्षणात्मक विचार ज्याच्या मनांत येणार नाहींत, असा वाचक तर सांपडणेंच कठीण. त्यांचीं सारींच मतें वाचणारांना ग्राह्य वाटतील असें नाहीं. उदाहरणार्थ, "लायकीबरोबरच आकर्षकताहि पाहिजे," या निबंधांत 'स्त्रियांच्या आकर्षकतेची आर्थिक मीमांसा कित्येकांना अतिरंजित वाटेल,' असा संशय लेखकानें स्वतःच व्यक्त केला आहे. ती अमान्य करणारांना लेखक ढोंगी म्हणतो हा भाग वेगळा! घरोघर आस्थापूर्वक वाचलें जावें, असें या पुस्तकाचें उपयुक्त स्वरूप आहे, हें मात्र निर्विवाद.

—'तरुण भारत' २७–१२–५३



### दि ॲग्रिकल्चरल् प्रोड्यूस मार्केट कमिटी, सांगली.

श्री. पां. ज. चिन्मुळगुंद आय. सी. एस.

रजिस्ट्रार को. सो. व डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरल् मार्केटिंग व रूरल फायनान्स, मुंबई राज्य, पुणें, यांचे हस्तें मार्केट कमिटीच्या ऑफीसच्या इमारतीचा कोनशिला समारंभ नुकताच झाला. त्यावेळीं घेण्यांत आलेलें छायाचित्र.

मुंबई सरकारनें दि बॉम्बे ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केटस् ॲक्ट, १९३९ अन्वयें शेतीचे मालाची खरेदी–विक्री योग्य रीतीनें व्हावी म्हणून ता. ३०–८–१९५० पासून सदर ॲक्ट मिरज तालुक्यास ( जि. दक्षिण सातारा ) लागू केलेला आहे. सदर ॲक्ट अन्वयें शेंग, शेंगदाणा, हळद, गूळ व मिरची हे जिन्नस नियमित करणेंत आले आहेत. त्याचप्रमाणें कापूस ( जिन्ड व अन्–जिन्ड ) तूर व तूरडाळ, हरभरा, हरभऱ्याची डाळ, करडई व धणें ह्याहि जिनसांची खरेदी–विक्री नियमित करणेबद्दल सरकारकडे विनंती करणेंत आली आहे.

अहवालाचे मुदतींत माधवनगर येथें १ जानेवारी, १९५२ पासून लायसेन्स्ड मार्केट यार्ड सुरू करण्यांत आलें आहे. अहवालाचे सालांत आवक कमी असली तरी मालाला एकंदरीनें भाव बरे होते. दोन सहकारी खरेदी–विक्री संघ मार्केट यार्डमध्यें आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ६ जानेवारी १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पंचवार्षिक योजनेचा १९५६–६१ या काळासाठी आराखडा–संभाव्य रूपरेषा

पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम जून, १९५६ अखेर पूर्ण होणार आहे, व नियोजन मंडळाच्या दुरुस्त आराखड्याप्रमाणें १९७६ पर्यंतच्या काळासाठी आणखी चार पंचवार्षिक योजना तयार केल्या जातील, व शेवटीं दरमाणशीं सरासरी उत्पन्न सर्व गोष्टी हिशेबांत घेऊन आजच्या दुप्पट होईल. पहिल्या पंचवार्षिक योजनेनुसार १९५६ पर्यंत दरमाणशीं सरासरी उत्पन्नांत ११ टक्के वाढ होणार आहे. १९५६–६१ या काळांतील दुसऱ्या आराखड्याबद्दल आतांपासूनच विचार चालू आहेत. या दृष्टीनें सूचक गोष्ट म्हणजे कांहीं दिवसांपूर्वी अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं असें सांगितलें कीं, पंचवार्षिक योजनेच्या दुसऱ्या आराखड्यांत उद्योगधंद्यांच्या वाढीवर जास्त लक्ष दिलें जाईल, व या बाबतींत खासगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांना बराच अवसर मिळूं शकेल. १९५६–६१ या पांच वर्षांत योजनेच्या कार्यावर एकूण खर्च ३,५०० ते ४,००० कोटि रु. केला जाईल असा एक अंदाज व्यक्त करण्यांत आला आहे. गोदावरी व नर्मदा नद्यांवरील पाणीपुरवठ्याचीं कामें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलीं जातील असा संभव आहे. उद्योगधंद्यांच्या बाबतींत पोलाद, वीज व रासायनिक द्रव्यांचें उत्पादन करणें या धंद्यांवर विशेष भर दिला जाईल. सरकारचें लक्ष फिनेल, मोटारींसाठीं लागणारें तेल व हवाई वाहातुकीसाठीं लागणारें स्पिरिट यांचें उत्पादन करण्याकडे वळलें आहे. आसाम व पश्चिम बंगाल या राज्यांत तेल मिळूं शकतें का या दृष्टीनें पाहाणी केली जाईल. एक उच्च दर्जाची तज्ज्ञांची कमिटी नेमून १९५६–६१ या काळांत कोणत्या पाणीपुरवठ्याच्या व विजेच्या उत्पादनाच्या योजना हातीं घेण्यांत याव्या याबद्दल राज्यसरकारांना विचारांत घेऊन निश्चित कार्यक्रम ठरविला जाईल. इंजिनियरिंग धंद्याच्या विकासाकडेहि लक्ष दिलें जाईल. खासगी धंद्यांत योग्य ती स्पर्धा राहावी व उत्पादनाचा दर्जा सुधारून गिऱ्हाइकाला योग्य किंमतींत माल मिळावा या दृष्टीनें नियंत्रण ठेवलें जाईल. धंद्यांच्या प्रादेशिक विभागणीकडे लक्ष पुरविलें जाईल व जे धंदे किफायतशीर ठरण्याची शक्यता दिसणार नाहीं ते सुरू केले जाणार नाहींत. कापडाच्या बाबतींत हातमागांच्या धंद्याच्या विकासाच्या दृष्टीनें सूत कांतण्याच्या नवीन गिरण्यांना कांहीं ठिकाणीं परवानगी दिली जाईल, व कांहीं सूत तयार करणाऱ्या गिरण्यांना उत्पादन सामर्थ्य वाढविण्याची परवानगी दिली जाईल. वनस्पती धंद्याच्या विकासाला साधारणपणें परवानगी दिली जाणार नाहीं. सिमेंटच्या बाबतींत ज्या कारखान्यांचा उद्देश सिमेंटची निर्गत करणें हा असेल अशाच नवीन कारखान्यांना परवानगी दिली जाईल. तांत्रिक, शास्त्रीय व संघटनेच्या ज्ञानाचा फायदा मिळूं शकेल अशा परराष्ट्रीय भांडवलाला परवानगी दिली जाईल.

## शेती आर्थिक परिषदेपुढील, श्री. कृष्णमचारी यांचें भाषण

इंडियन सोसायटी फॉर अॅग्रिकल्चरल् एकॉनॉमिक्स या संस्थेच्या १४ व्या वार्षिक परिषदेपुढें जयपूर येथें ता. २५ डिसेंबर रोजीं अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष श्री. व्ही. टी. कृष्णमचारी म्हणाले कीं, १९२१ पासून लोकसंख्येच्या झालेल्या वाढीमुळें दर माणशीं लागवडीस आणलेल्या शेतजमिनीचें क्षेत्र कमी होत गेल्यामुळें शेतीच्या धंद्यांत बेकारी व अपुरें काम या दोनहि गोष्टी जास्त प्रमाणांत दिसून येत आहेत, १९२१ मध्यें दरमाणशीं लागवडीखालील जमिनीचें क्षेत्र १११ सेंट होतें तें १९५१ मध्यें ८४ सेंट झालें आहे. याच कालांत पाटबंधाऱ्याखालील जमिनीचें दरमाणशीं प्रमाण १८ सेंटपासून. १४ सेंटपर्यंत उतरलें आहे. सुमारें ७ कोटि कुटुंबें २५ कोटि एकर जमीन लागवडीस आणतात परंतु यापैकीं फक्त एक पंचमांश जमीन दुपिकी आहे. याशिवाय चिंतनीय गोष्ट म्हणजे लागवडीखालील एकूण जमिनीपैकीं तीनचतुर्थांश जमीन मान्सूनपावसाच्या नियमितपणावर अवलंबून आहे. पाऊस फक्त चारच महिने पडतो व ऑक्टोबरपासून मे अखेरपर्यंत अत्यंत अल्प प्रमाणांत पाऊस पडतो. पावसाच्या या स्वरूपाचा ग्रामीण जीवनावर अतिशय महत्त्वाचा परिणाम होतो. 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेमुळें फार तर २ ते ४ टक्के लागवडीखालील जमिनींत शास्त्रीय दृष्टीनें उत्पादनाच्या बाबतींत सुधारणा झाली आहे. शेतीच्या धंद्यांत दिसून येणारी बेकारी व अपुरें काम या गोष्टी आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक आहेतच, परंतु मानवी जीवनांतील मूल्याच्या दृष्टीनेंहि या गोष्टी अगदीं नुकसानकारक आहेत.

या प्रकारच्या परिस्थितीला तोंड देणें हा पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाचा एक मुख्य उद्देश आहे. शेतीच्या धंद्यांत शास्त्रीय दृष्ट्या शक्य तितक्या सुधारणा करण्याकडे लक्ष दिलें जांत आहे. शेतीमध्यें मच्छीमारी, कोंबडीं, दुभतीं जनावरें इ. प्राण्यांची जोपासना, या गोष्टींचाहि समावेश व्यापक अर्थानें करण्यांत आला आहे. पाणीपुरवठ्याच्या मोठ्या व लहान योजना आणि विजेचें उत्पादन याहि गोष्टींकडे लक्ष दिलें जात आहे. याशिवाय खेडेगांवांतील लोकांना शेतीला पूरक म्हणून रिकाम्या वेळांत करतां येण्यासारखे बैठे धंदे सुरू करण्याकडे व वाढविण्याकडे लक्ष दिलें जात आहे. शेतीच्या धंद्यांत हळूहळू अद्ययावत् सुधारणा शास्त्रीय दृष्टीनें करतां आल्या म्हणजे शेतींतून आणखी माणसांना निवृत्त व्हावें लागेल. नियोजन मंडळाचें याहि गोष्टीकडे लक्ष आहे. पाण्याची टंचाई ज्या भागांत दिसून येते तेथें कायम स्वरूपाच्या पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेसाठीं ४० कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली आहे. याशिवाय ५६० कोटि रु. मोठ्या व मध्यम पाणीपुरवठ्याच्या योजनांवर १९५६ पर्यंत खर्च केले जाणार आहेत. यामुळें १·८ कोटी एकर जमीन पाण्याखालीं येईल.

## आशिआमधील लोकशाहींचें भवितव्य

भारतामधील अमेरिकेचे माजी वकील मि. चेस्टर बोल्स ह्यांनीं 'लाइफ' ह्या नियतकालिकांत एक लेख लिहून आशिआतील लोकशाहींबद्दल विचार व्यक्त केले आहेत. ते आपल्या लेखांत म्हणतात कीं, कम्युनिस्ट राष्ट्रें आशिआंतील राष्ट्रांना आर्थिक मदत देण्याच्या बाबतींत अमेरिकेशीं जेव्हां स्पर्धा करूं लागतील तेव्हांच ह्या राष्ट्रांतील लोकशाहींची खरी परीक्षा होणार आहे. आपण सध्या जी मदत करीत आहों ती यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यावर सो. युनिअन स्वस्थ बसेल असें मला वाटत नाहीं. अर्थकारण हा राजकारणाचा पाया आहे हें तर कम्युनिझमचें सूत्रच आहे. गेल्या वर्षी सो. रशिआंत अमेरिकेंतल्यापेक्षा एकतृतियांश अधिक इंजिनिअर्स तयार झाले. त्यांपैकीं कांहीं आशिआ, आफ्रिका आणि द. अमेरिका ह्या देशांतून पाठविले जाणें शक्य आहे. रशिअन सरकार चीनला आणि उत्तर कोरिआला सध्या मदत करीत आहे. तशीच मदत आशिआंतील राष्ट्रांना रशिअन सरकार करूं लागल्यावर त्यांची प्रगति झपाट्यानें होणें शक्य आहे. ही मदत मुख्यतः कर्जे, उधारीनें माल देणें आणि तांत्रिक साह्य देणें, अशा स्वरूपाची आहे. पण अशा तऱ्हेची स्पर्धा होऊं लागल्यास अमेरिकेनें तिचें स्वागतच केलें पाहिजे. कारण, अविकसित देशांच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक विकास साधण्यासाठीं अमेरिका जितकी मदत करूं शकेल तितकी इतर कोणतेंहि राष्ट्र करूं शकणार नाहीं. मि. बोल्स ह्यांच्या लेखांतील बराच मोठा भाग भारतांत 'पॉइंट फोर' मदतीचा कार्यक्रम कसा पार पाडला जात आहे त्याविषयीं माहिती देणारा आहे.

---

## भारतीय भांडवलाला इजिप्तमध्यें वाव

इजिप्त सरकारचें एक व्यापारी मंडळ सध्या भारताचा आणि अतिपूर्वेकडील देशांचा दौरा करीत फिरत आहे. मंडळाचे पुढारी मि. हुसेन फामी ह्यांनीं पत्रकारांशीं बोलतांना असें सांगितलें कीं इजिप्तमधील उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणण्यासाठी भारतीय भांडवलाची मदत झाली तर ती आम्हांला पाहिजे आहे. भारतानें 'इलेक्ट्रॉनिक्स' ह्या नव्या धंद्याबाबत चांगली प्रगति केली आहे. हा धंदा भारतानें इजिप्तमध्यें सुरू केल्यास बरें होईल. इजिप्तमधील बाजारपेठ खुली असून तींत खऱ्याखुऱ्या व्यापारी स्पर्धेला चांगला वाव आहे. अशा स्पर्धेत हस्तक्षेप करण्याचें सरकारचें धोरण नाहीं. पण अयोग्य स्पर्धा करण्यासाठी मालाच्या किंमती कृत्रिम रीतीनें भलत्या उतरविण्यांत आल्यास मात्र सरकारचा नाइलाज होईल. इतर देशांपैकीं कोणी इजिप्तमध्यें आपलें भांडवल गुंतविलें आहे काय ? असा प्रश्न विचारला असतां मि. फामी म्हणाले कीं फ्रान्सनें विजेच्या तारा तयार करण्याच्या धंद्यांत कांहीं भांडवल घातलें आहे. अमेरिकेनेंहि कांहीं उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविलें आहे. इजिप्तमध्यें भांडवल गुंतविण्यास राजकीय संबंधांची बाब विशेष महत्त्वाची नाहीं. परंतु, गुंतविलेल्या भांडवलाची शाश्वति ही मात्र फार महत्त्वाची बाब आहे. परकीय भांडवल इजिप्तमध्यें यावें म्हणून आर्थिक व्यवहार प्रामाणिकपणानें, सचोटीनें आणि सरळपणें करण्याची इजिप्तची तयारी आहे. मि. फामी ह्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ जपान, इंडोनेशिया व सीलोन ह्या देशांचा दौरा करून भारतांत आलें आहे. जपानमधील मालाची किंमत फार असल्यानें देशाच्या निर्यात व्यापारावर परिणाम होत आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

## अर्थ

( संपादक—श्री. श्रीपाद वामन काळे, 'दुर्गाविलास', ८२३ शिवाजीनगर, पुणें ४; पृष्ठें ५०; मूल्य रु. १ )

आर्थिक विषयांच्या चर्चेला वाहिलेल्या पुणें येथील 'अर्थ' या साप्ताहिकाचा दिवाळी अंक उपयुक्त माहिती आणि उत्तम विवेचन अशा दोन्ही दृष्टींनीं वाचनीय आहे. बँकिंग आणि पंचवार्षिक योजना यांना भारताच्या वर्तमान अवस्थेंत आणि भावी प्रगतींतहि विशेष महत्त्वाचें स्थान आहे. म्हणून या विषयांची सांगोपांग चर्चा आंकडेवारीसह करण्याचा उपक्रम संपादकांनीं केला हें समयोचित म्हटलें पाहिजे. 'भारताच्या पंचवार्षिक योजनेंत शेतीवर भर कां ? या लेखांत इतर राष्ट्रांतील अनुभवांच्या आधारें भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेचें अवलोकन केलें असून या योजनेच्या मार्गांतील अडचणींचेंहि थोडक्यांत चांगलें दिग्दर्शन केलें आहे. श्री. शं. ज. जोशी यांच्या 'मध्यम वर्गाला आवाहन' या लेखाचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. मध्यमवर्गीयांची सध्यां जी आर्थिक आणि सांस्कृतिक विटंबना होत आहे तिचा मूलग्राहि विचार या लेखांत आला असून उज्ज्वल भवितव्य निर्माण करण्याच्या दृष्टीनें करण्यांत आलेलें मार्गदर्शन आशाप्रद वाटतें. श्री. बी. बी. पाटील यांनीं 'मोड—कचरा व चिंध्या हीं संपत्ति-सोनें आहे' या लेखांत निरुपयोगी वाटणाऱ्या वस्तूंपासूनहि धनोत्पादक व्यवसाय कसे करतां येतील या लेखांत दिलेली माहिती जशी उपयुक्त आहे तशीच त्या लेखांतील सरकारी धोरणावरील टीकाहि सडेतोड आहे.

एकंदरींत 'अर्था'च्या या विशेषांकांत ज्या मोजक्या विषयांची चर्चा केली आहे ती सामान्य वाचकांना जिव्हाळ्याची आणि उद्बोधक वाटेल.

—उद्यम, डिसेंबर १९५३

---

## बॉंबे स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन

लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना भांडवलाची मदत करण्यासाठी वरील संस्था स्थापन करण्यांत आली आहे. तिचें अधिकृत भांडवल २ कोटी रु. व विक्रीस काढलेलें भांडवल १ कोटी रु. आहे. तें प्रत्येकी १०० रु. च्या १,००,००० भागांत विभागलेलें आहे. त्यापैकीं मुंबई सरकारनें ३० लक्ष रु. चें आणि रिझर्व्ह बँकेनें २१ लक्ष रु. चे शेअर्स घेतले असून ४९ लक्ष रुपयांचे शेअर्स विक्रीसाठी आहेत. ३½% करमाफ डिव्हिडंडची हमी सरकारनें घेतली आहे. श्री. पुरुषोत्तमदास कानजी हे कॉर्पोरेशनचे चेअरमन असून श्री. आर. एस. भट्ट हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

## रशिआ—भारत व्यापाराचे आंकडे

| | १९५०–५१ (रुपये) | १९५१–५२ (रुपये) | १९५२–५३ (रुपये) |
|---|---|---|---|
| भारताची आयात | २३,९३,५८० | १,३८,२९,९२७ | २४,१७,९०१ |
| निर्यात | १,३४,०८,८११ | ६,६७,१८,०४४ | ८५,४१,३४० |

---

## सौराष्ट्र सरकारचे बँकेचे व्यवहार रिझर्व्ह बँकेकडे

१ जानेवारी १९५४ पासून सौराष्ट्र सरकारचे एकमेव बँकर म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची नेमणूक झाली आहे. आतांपर्यंत हैद्राबाद, म्हैसूर, मध्यभारत व त्रावणकोर—कोचीन या राज्यांबरोबर करण्यांत आलेल्या करारांचे धर्तीवरच हा करार करण्यांत आला आहे.

## सहकारी सोसायट्या आणि इन्कमटॅक्स

भारत सरकारनें नेमलेल्या कर चौकशी मंडळानें एक प्रश्न पत्रिका काढली आहे. "सहकारी सोसायट्यांचा सहकारी व्यवहारांतील नफा आज प्राप्तीकरमुक्त आहे, त्यावर इन्कमटॅक्स व सुपरटॅक्स बसवावा काय? बसविला, तर सहकारी सोसायट्यांना कंपन्यांसमान मानावें, का त्यांवर कमी दरानें आकारणी करावी? कराची सध्याची माफी चालू ठेवली, तर ती कांहीं विशिष्ट प्रकारच्या सहकारी सोसायट्यांपुरतीच मर्यादित करावी काय?" अशा तऱ्हेचा एक प्रश्न त्या प्रश्नपत्रिकेंत आहे. बॉंबे को. बँक्स असोसिएशननें मंडळाच्या प्रश्नपत्रिकेंतील सहकारी संस्थांना लागू पडणाऱ्या प्रश्नांस सविस्तर उत्तरें देऊन सहकारी चळवळीच्या हितास पोषक असें विवेचन केलें आहे.

### आजची परिस्थिति

१९२५ मध्यें हिंदुस्थान सरकारनें सहकारी सोसायट्यांच्या नफ्यास इन्कमटॅक्सची माफी दिली. त्याचप्रमाणें, सोसायटीकडून तिच्या सभासदांस डिव्हिडंड वगैरे जें मिळेल, तेंहि करमाफ करण्यांत आलें. सहकारी सोसायटीचे सभासद हे सर्व मिळूनच सोसायटी बनतात; स्वतःपासूनच स्वतःचाच फायदा झाला किंवा नफा मिळवला, असें म्हणतां येत नाहीं. एका खिशांतून दुसऱ्या खिशांत पैसा जाण्याचाच तो प्रकार आहे, आणि कांहीं उत्पन्नाचा विनियोग व्यवस्था खर्चाकडे केल्यावर उरलेल्या उत्पन्नांतून गंगाजळी निर्माण केली जाते किंवा सभासदांना डिव्हिडंड किंवा व्याजांत रिबेट ह्या स्वरूपांत रकम परत केली जाते.

१९२५ च्या नोटिफिकेशननें सहकारी सोसायटीच्या सर्व नफ्यास -- तो नफा कोठूनहि प्राप्त होवो — कराची माफी दिली. सोसायट्यांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक वाढली आणि सरकार त्यावर व्याज देतांना इन्कमटॅक्स कापून घेऊं लागलें, तेव्हां सरकारी रोख्यांवरील व्याजहि करमुक्त आहे किंवा नाहीं, असा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां खुलासा करण्यासाठी १८ ऑगस्ट, १९४५ रोजीं एक नोटिफिकेशन काढण्यांत आली, तिची अंमलबजावणी सध्यां चालू आहे, आणि त्यास अनुसरून सध्याची परिस्थिति खालीलप्रमाणें आहे:—

(१) सहकारी सोसायटीवर "असोसिएशन ऑफ इंडिव्हिज्युअल्स" म्हणून व बँकिंग कंपनीवर कंपनी म्हणून कर आकारला जातो.

(२) सहकारी सोसायटीवर "असोसिएशन ऑफ इंडिव्हिज्युअल्स" म्हणून हळुहळु वाढत जाणाऱ्या दरानें कर आकारला जातो. बँकिंग कंपनी कंपनी कायद्याखाली नोंदलेली असल्यानें तिच्यावर कमाल दरानें आकारणी होते. (रुपयांत ४ आणे + ५% सरचार्ज आणि सबंध उत्पन्नावर रुपयांत ३ आणे सुपरटॅक्स)

(३) सहकारी सोसायटीचा ४,२०० रु. खालील नफा करमुक्त आहे. बँकिंग कंपनीला अशी किमान करमुक्ततेची सवलत नाहीं.

(४) सहकारी सोसायटीस सहकारी व्यवसायापासून होणारा नफा सर्वस्वी करमाफ आहे. इनकमटॅक्स कायद्याच्या ८, ९ आणि १२ ह्या कलमांत सांगितलेल्या उत्पन्नावर फक्त कर आकारणी होते. बँकिंग कंपन्यांना ६ वें कलम लागूं आहे.

(५) इन्कम टॅक्सच्या दृष्टीनें सहकारी सोसायटीचें एकूण उत्पन्न विचारांत घेतांना सहकारी व्यवसायापासून मिळालेलें परंतु इन्कमटॅक्सला आणि सुपरटॅक्सला पात्र नसलेलें उत्पन्नहि मिळवलें जातें. बँकिंग कंपनीच्या बाबतींत, इन्कमटॅक्स कायद्याच्या ६ व्या कलमाखालीं सर्व ठिकाणाहून आलेल्या प्राप्तीचा समावेश केला जातो. म्हणजे, बँकिंग कंपनीचें एकूण उत्पन्न आणि करपात्र उत्पन्न हें जवळजवळ सारखेंच असतें; सहकारी बँकेचे बाबतींत तसें नसतें.

(६) बिगर-सहकारी व्यवसायाच्या उत्पन्नांतून व्यवस्था खर्च वजा घालतां येत नाहीं; व्यवस्थेचा सर्वच्या सर्व खर्च फक्त सहकारी व्यवसायाच्या उत्पन्नांतूनच वजा घालतां येतो.

(७) इन्कमटॅक्सचा दर ठरविण्यासाठीं सहकारी सोसायटीचें डिव्हिडंड "ठोक" करून दाखवावें लागत नाहीं; त्यावर करहि आकारला जात नाहीं.

(८) इन्कमटॅक्स कायद्याच्या ८ व्या कलमानें सहकारी सोसायटीच्या डिबेंचरांना "सिक्युरिटीज" असें मानलेलें नाहीं. त्यामुळें त्यांवरील व्याज देतांना इन्कमटॅक्स कापून घ्यावा लागत नाहीं. डिबेंचर धारण करणाऱ्या व्यक्तीस मात्र तो भरावा लागतो. त्यामुळें, सरकारचें नुकसान न होतां, डिबेंचर धारण करणाऱ्या लहान आसामींची मात्र सोय होते. सहकारी सोसायटी ही ८ व्या कलमाप्रमाणें लोकल ॲथॉरिटी किंवा "कंपनी" नसल्यामुळें, कर कापून घेण्याचें बंधन तिच्यावर नाहीं.

सहकारी सोसायटीचा उद्देश परस्पर-साहाय्य हा असल्यानें, स्वतःपासूनच स्वतःचा फायदा ती मिळविते असें म्हणतां येत नाहीं, ह्या तत्त्वावरच सोसायटीच्या सहकारी व्यवसायावरील नफ्यास करमाफी आहे. सोसायटीचा सबंध व्यवस्था खर्चाचा बोजा इन्कम टॅक्सच्यासाठीं, सहकारी व्यवसायांतील नफ्यावर लादला जातो. इतर नफ्यावर कर आकारतांना व्यवस्था खर्च विचारांत घेतला जात नाहीं. सहकारी कायदा व कानू ह्याप्रमाणें सहकारी बँकेच्या खेळत्या भांडवलापैकीं ३० ते ४० टक्के भांडवल सहकारी रोख्यांत "फ्लुइड रिसोर्स" म्हणून गुंतून राहतें, आणि त्यावरील उत्पन्न करपात्र ठरतें. म्हणून, सहकारी बँकांजवळील रोख्यांवरील व्याजासहि करमाफी असावी.

### सहकारी पतपेढ्या व शेतकरी

सहकारी व्यवहारावर इन्कमटॅक्स बसविला, तर त्यामुळें सहकारी पत-व्यवहारांवर कर बसविल्यासारखें होईल. केंद्रस्थानीं एक संस्था, जिल्हा संस्था आणि तळाशीं प्राथमिक सहकारी सोसायट्या अशी सहकारी पतव्यवस्थेची रचना आहे. सहकारी नफ्यावर कर बसविला, तर तो तीनहि टप्प्यांत वसूल केला जाईल. त्यामुळें दिलेल्या कर्जावरील व्याजाचे दर वाढवावे लागतील आणि शेतकऱ्यावर त्याचा बोजा बसेल. परंतु, त्याला स्वस्त दरानें कर्ज मिळण्याचें तर प्लॅनिंग कमिशनचें धोरण आहे. शेतकी कमिशन आणि गाडगीळ समिति ह्या दोघांच्याहि मतें, हा दर ६% पेक्षा ज्यास्त असूं नये. तेव्हां, सध्याची ७१३/१६% ही पातळी राखावयाची म्हटली तरी सरकारला सहकारी पतसंस्थांना मदत द्यावी लागेल. म्हणजे, सोसायट्यांच्या सहकारी नफ्यावर इन्कमटॅक्स बसविला तर सरकारी खजिन्यावरच त्याचा अप्रत्यक्ष भार पडणार. मुंबई आणि मद्रास हीं राज्यें सहकारी चळवळीच्या बाबतींत पुढारलेलीं आहेत, पण तेथेंहि अखेरच्या शेतकऱ्यास ८% दर पडतो. इतर राज्यांतून तो ८% ते १२% असतो. जमिनदारी, तालुकदारी आणि इनामदारी पद्धति नष्ट करण्यांत येत आहेत आणि जमीनधाऱ्याच्या पद्धतींत आमूलाग्र सुधारणा केल्या जात आहेत. शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं मोठ्या खर्चाच्या सरकारी योजना हातीं घेतल्या जात आहेत.

अशा परिस्थितींत, पतपेढ्यांच्या सहकारी नफ्यावर इन्कमटॅक्स आकारणें शेतीच्या उत्पादनवाढीस पोषक होणार नाहीं.

## अर्बन बँका

अर्बन सहकारी बँकांची प्रगति मुंबई राज्यांत इतर राज्यांपेक्षा अधिक झालेली आहे. लहान व्यापारी व कारागीर ह्यांची गरज भागविणें हा ह्या बँकांचा उद्देश असून त्यांपैकी कित्येकांचें वार्षिक उत्पन्न ४,२०० रुपयेहि (इन्कमटॅक्ससाठी किमान उत्पन्न) नसतें. डिव्हिडंड, रिझर्व्ह फंड, व्याजांत रिबेट, इत्यादि बाबत शेतकी पतपेढ्यांना जे नियम लागू आहेत तेच अर्बन सहकारी बँकांनाहि आहेत. बिनसरकारी सत्प्रवृत्त सल्लागारांचा त्यांनाहि विनामूल्य फायदा मिळतो. असें असूनहि, सावकारी कायद्यानें कमाल व्याजाच्या दरापेक्षा कमी दरानें कर्जे देणें ह्या बँकांपैकी बहुतेकांना आजहि शक्य होत नाहीं. अर्बन बँकांना रिझर्व्ह बँकेकडून किंवा राज्य सरकारकडून दरांत सवलत मिळत नाहीं; शेतकी पतपेढ्यांना ती मिळते. मोठ्या व्यापारी बँकांशीं स्पर्धा करूनच त्यांना आपले व्यवहार चालवावे लागतात, परंतु अर्बन बँकांच्या अभावीं किरकोळ व्यापारी व कारागीर ह्यांना व्यवसायासाठी पैसे उभारणें कठीण जाईल. अर्बन बँकांचा व्यवस्था खर्च मात्र, स्वाभाविकच, मोठ्या व्यापारी बँकांपेक्षां ज्यास्त असतो. तेव्हां, त्यांच्या सहकारी नफ्यावर इन्कमटॅक्स बसविला, तर किरकोळ व्यापारी व कारखानदार ह्यांना मिळणाऱ्या कर्जावरील व्याजाचा बोजा बराच वाढेल.

## खरेदी–विक्री संघ

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच बहुतेक खरेदी–विक्री संघ अस्तित्वांत आलेले आहेत. नियंत्रित मालाचें वाटप करण्याचे कामीं त्यांना प्राधान्य देण्याचें सरकारचें धोरण आहे आणि त्यास अनुसरून ह्या संघांना पुष्कळ सवलती देण्यांत आल्या. त्याचा फायदा घेण्यासाठी कित्येक नव्या संस्था स्थापन होऊन घाऊक व किरकोळ विक्रीचें काम करूं लागल्या. नियंत्रणाचें काळांत त्यांना नफा बरा झाला, परंतु फक्त जो नफा सहकारी व्यवसायाचा होता तेवढाच नफा करमुक्त होता. बिगर सभासदांना केलेल्या मालविक्रींत जो नफा उरला, तो करपात्र होता. कापड, लोखंड, पोलाद, सिमेंट, इत्यादींवरील नियंत्रणें दूर झाल्यानंतर कित्येक खरेदी–विक्री संघांची स्थिति बिघडली आहे. स्थानिक खरेदीदार नसले, तरी सरकारी हुकुमानुसार माल घेऊन ठेवावा लागल्यानें साठे फुगून कित्येक संघांचें नुकसान झालें. विशेषतः मुंबई राज्यांतील संघांवर इन्कमटॅक्स बसविल्यानें आतां त्यापासून फारशी वसुली होण्याजोगी परिस्थिति नाहीं.

## सहकारी सोसायट्यांवर इन्कमटॅक्स कां नको?

दि बॉंबे को. बँक्स असोसिएशननें टॅक्सेशन इनक्वायरी कमिशनच्या प्रश्नावलीस उत्तर देतांना वरीलप्रमाणें सांगोपांग चर्चा केली असून खालीलप्रमाणें निष्कर्ष काढला आहे:—

(१) सहकारी सोसायटीला तिच्या सभासदांशीं व्यवहार करून मिळणारें उत्पन्न हा नफा नसून, सोसायटीच्या एका खिशांतून दुसऱ्या खिशांत होणारी ती वर्गावर्गी आहे.

(२) वेगवेगळ्या राज्यांतील सहकारी सोसायट्यांची प्रगति कमी ज्यास्त प्रमाणांत झालेली आहे. बिहार, ओरिसा, आसाम, बंगाल आणि पंजाब येथें त्यांची पुनर्घटना चालू आहे व ती प्रत्यक्ष सरकारी मदतीवर अवलंबून आहे. विंध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, राजस्थान आणि सौराष्ट्र येथें तर सहकारी चळवळीस अद्याप नीटशी चालनाहि मिळावयाची आहे.

(३) सहकारी चळवळीस ५० वर्षांपूर्वी प्रारंभ झाला असला, तरी सर्व सहकारी संस्था जुन्या नाहींत व त्यांची वाढहि सम प्रमाणांत झालेली नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच सहकारी चळवळीस विशेष चालना मिळालेली आहे.

(४) काटकसरीचा कारभार, विनावेतन मार्गदर्शन, सरकारी मदत आणि रिझर्व्ह बँकेकडून १½% दरानें कर्जपुरवठा, इतक्या अनुकूल बाबी असूनहि अखेरच्या शेतकरी कर्जदारास अद्यापहि भारी दरानेंच कर्जपुरवठा होतो.

(५) जे कित्येक खरेदी–विक्री संघ प्रत्यक्ष सरकारी मदत व सरकारी वांटप नियंत्रणें ह्यामुळें स्थापन झाले, ते नियंत्रणें दूर झाल्यामुळें संकटांत आले आहेत.

(६) वसूल भांडवलावर ६¼% (बोनस धरून) पेक्षा ज्यास्त दरानें सहकारी सोसायट्या डिव्हिडड वाटूं शकत नाहींत.

(७) सोसायटी लिक्विडेशनमध्यें गेली, तर तिचे रिझर्व्ह सभासदांना किंवा भागदारांना मिळत नाहींत; त्यांचा विनियोग खालीलप्रमाणें केला जातो:—

(अ) स्थानिक सामाजिक उपयुक्ततेची बाब,

(ब) चॅरिटेबल एन्डोमेंटस अॅक्ट, १८९०, कलम २ मध्यें व्याख्या केलेली उपकारक बाब,

(क) बॉंबे सेंट्रल को. इन्स्टिट्यूट व त्याच जागीं नोंदलेल्या नव्या सोसायटीचा रिझर्व्ह, रजिस्ट्रारच्या मंजुरीनें.

## सोसायट्यांच्या अडचणी वाढतील

इन्कमटॅक्ससाठी सहकारी सोसायट्यांना कंपन्या म्हणून मानणें योग्य होणार नाहीं; कारण त्यामुळें त्यांवर पडणारा कराचा दरहि चढीचा होईल. कंपन्यांच्या बाबतींत करमाफ उत्पन्नाची ४,२०० रु. ची मर्यादा नाहीं. एकट्या मुंबई राज्यांतच १८,००० सोसायट्या आहेत; त्यांपैकी ९,००० प्राथमिक शेतकी पतपेढ्या आहेत. त्यांपैकी कित्येक पतपेढ्यांना साधे हिशेब लिहिण्यासाहि लायक नोकरवर्ग ठेवणें परवडत नाहीं. त्यांना दरसाल इनकमटॅक्सचे तक्ते सादर करावयास लावले, तर त फारच कठीण काम होईल. त्यांचे सर्व सभासद गरीब वर्गांतलेच असतात व त्यांचें उत्पन्न करपात्र असूं शकत नाहीं. हें सर्व सोडलें, आणि केवळ उत्पन्नाच्या दृष्टीनें विचार केला, तरी जर सर्व सोसायट्यांना कंपन्या मानलें तर मिळणारी कराची रक्कम तो वसूल करण्यास येणाऱ्या खर्चापेक्षांहि कमी भरेल. बहुतेक सोसायट्यांना ह्या नव्या कामासाठी नेमाव्या लागणाऱ्या नोकरांस पगार देणें मुष्किलीचें होईल. सहाजिकच, विनावेतन काम करणारे बिनसरकारी लोक ही नसती जबाबदारी पत्करण्यापेक्षा पदाधिकारी होण्यासच नाकबूल होतील.

फक्त कांहीं प्रकारच्याच सोसायट्यांस इन्कमटॅक्सची माफी असावी असें कोणी प्रतिपादन केलें तर तें मूलतःच चुकीचें ठरेल. कारण, सोसायट्यांना सभासदांकडून मिळणारा नफा हें स्वतंत्र उत्पन्न नसून ती फक्त एका खिशांतून दुसऱ्या खिशांत होणारी तात्कालिक वर्गावर्गी असते. नफा मिळविणें हा सहकारी सोसायट्यांचा उद्देशच नसतो; सभासदांची सेवा करणें व त्या सेवेसाठी मिळणारा मोबदला खर्चापेक्षां ज्यास्त वसूल झाला तर तो सभासदांना परत करणें, हाच त्यांचा उद्देश असतो.

### दि वार्शी सें. को. बँक लि.

ह्या बँकेच्या पटावर १,००९ सभासद आहेत, त्यांपैकी सोसायट्या ९७ व व्यक्ती ९१२ आहेत. ह्याशिवाय, नाममात्र २६३ आहेत. बँकेचें शेअर भांडवल, ठेवी इत्यादींत बाढ असून, गेल्या पांच–सहा वर्षांपासून बँकेचें भांडवल मोकळें न ठेवतां बँकेच्या व्यवहारांत सतत गुंतविण्याचें योग्य धोरण ठेवल्यामुळें बँकेच्या एकंदर व्यवहारांत व नफ्यांत चांगली वाढ झाली आहे. सहा वर्षांपूर्वी एकूण व्यवहार ५१ लक्ष रु. होता, तो गेल्या वर्षी जवळजवळ १ कोटी रु. झाला. अहवालाचे वर्षी तालुक्यांत दुष्काळी परिस्थिति होती व महागाईहि वाढलेली होती, तरी बोर्डाच्या दक्षतेमुळें बँकेचा कारभार समाधानकारक झाला. स्थानिक मिल्स ठेवीदारांना भारी व्याजाचे दर देत आहेत व गांवांत स्थानिक बँका वाढत आहेत, तरी ह्या बँकेंतील ठेवी सालोसाल वाढत आहेत, ही गोष्ट संचालकांना व व्यवस्थापकांना भूषणावह आहे. सोसायट्यांच्या वाढत्या गरजांस बँकेनें प्राधान्य देऊन त्यांनाच कर्जें प्रथमतः दिलीं आहेत व त्यानंतर व्यक्तिमात्र सभासदांना दिलीं आहेत. हेंच धोरण पुढेंहि अंमलांत रहाणार आहे. बँकेच्या वैराग शाखेंत अहवालाचे वर्षी बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार सुरू करण्यांत आले. त्या शाखेचें काम वाढत आहे. बँकेच्या दैनंदिन खर्चाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण उतरलें आहे. बँकेच्या स्थापनेपासून ती "अ" वर्गांत आहे. बँकेनें सोसायट्यांच्या देखरेखीची व तपासणीची भरपूर व्यवस्था केलेली आहे. बँकेच्या इमारतीतींहि थोडी वाढ करण्यांत आली आहे. अशा रीतीनें, सर्वांगीण प्रगति करूनहि बँकेनें योग्य नफा मिळविला असून भागीदारांना ६½% डिव्हिडंड वाटलें आहे. (चेअरमनः माधव विष्णु विश्वरूपे, बी. एससी., एलूएल्. बी. व्हाइस चेअरमनः रामचंद्र गोविंद परंडेकर. मॅनेजरः विश्वनाथ एकनाथ हंडे.)

### मशीन टूल कारखान्यासाठी १०० विदेशी तज्ज्ञ

हिंदुस्थान मशीन टूल्स, बंगलोरच्या कारखान्यासाठी १०० विदेशी तांत्रिक तज्ज्ञ मिळविण्यासाठी कारखान्याचे जनरल मॅनेजर जिनीव्हाला गेले आहेत. प्रस्तुत कारखान्यांत १·५ कोटि रु. भांडवल गुंतविलेलें असून त्यांत मध्यवर्ती सरकार व ओरिनकॉन मशीन टूल वर्क्स (झुरिच) ह्यांचे हितसंबंध आहेत. जून, १९५४ मध्यें उत्पादनास प्रारंभ होईल.

### फोर्ड कंपनीचे वितरक

दि फोर्ड मोटर कंपनी ऑफ इंडियानें जॉर्ज ओक्स लि.ला फोर्ड पॅसेंजर गाड्या, ट्रक्स आणि स्पेअर पार्टस ह्यासाठीं सर्व भारताचे वितरक (डिस्ट्रिब्यूटर्स) नेमले आहे. ही कंपनी पूर्णपणें स्वदेशी असून तिची मुख्य कचेरी मद्रास येथें आहे. श्री. एस. अनंतरामकृष्णन् हे तिच्या बोर्डाचे चेअरमन आहेत.

### डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स आणि पूना हायस्कूल ऑफ कॉमर्स ह्यांचें वार्षिक संमेलन दि. २७ रोजीं श्री. दा. वा. पोतदार, बी. ई. (इले., मॅके.) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें.

### पांच

अहमदनगर सहकारी दिनोत्सवानिमित्त काढलेलें कॅलेंडर. कॅलेंडरवर अहमदनगर जिल्ह्यांतील निरनिराळ्या सहकारी संस्थांची आकर्षक रीतीनें माहिती दिलेली आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

**शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलूएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नासिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाल्वेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. वा. साल्वेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

**बँकर कसा असावा ?**

" सहानुभूति, दया, परिस्थितीची जाणीव, स्वतःच्या कामाची माहिती, मदत करण्याची तत्परता, ज्यांना मदत हवी असेल, अशांना सेवावृत्तीनें साहाय्य करण्याची तयारी, इत्यादि गुण बँकरमध्यें आवश्यक आहेत. त्यानें गुप्तता राखली पाहिजे, कधींहि चकाट्या पिटता कामा नयेत आणि गिऱ्हाइकांना योग्य तोच सल्ला दिला पाहिजे. योग्य सल्ला देतां यावा, ह्यासाठीं त्यानें आर्थिक, व्यापारी, औद्योगिक व राजकीय क्षेत्रांतील घडामोडींची अद्ययावत माहिती मिळविली पाहिजे. त्यानें गिऱ्हाइकांचे स्नेही ह्या दृष्टीनें मार्गदर्शन केलें पाहिजे, सल्ला देतांना निर्विकार वृत्ति धारण केली पाहिजे आणि अडचणींतून कसा मार्ग काढावयाचा, हें त्याला सांगतां आला पाहिजे.":— मि. एच. सी. मॅक्कॉल, चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना ( मुंबई ) चे मॅनेजर.

**सहकारी मुद्रणालय स्थापन करण्याचे प्रयत्न**

राज्यांतील सर्व सहकारी संस्थांकरितां वऱ्हाड सहकारी संस्था एक मुद्रणालय स्थापन करण्याचें ठरवीत आहे आणि या कामाकरितां ५०,००० रु. चें शेअर कॅपिटल उभारण्यासाठीं या संस्थेनें एक विनंती-पत्रक काढलें आहे; अंदाजें २०,००० रु. ची रक्कम मिळविण्याबाबतचीं आश्वासनें आधींच मिळालीं आहेत. पुरेसें कॅपिटल जमा झाल्यास, अद्ययावत् सामुग्री व प्रशिक्षित नोकरवर्ग यासहित अमरावती येथें मुद्रणालय स्थापन करण्यांत येईल. मद्रास राज्यांत तीन सहकारी मुद्रणालयें असून, मुंबई, हैद्राबाद व पश्चिम बंगालमध्येंहि त्यांची स्वतःचीं सहकारी मुद्रणालयें आहेत.

**अमेरिकेंत लष्करी विमानांचें उत्पादन**

युनायटेड स्टेट्सनें १९५३ मध्यें १२,००० लष्करी विमानांचें उत्पादन केलें.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— " बोलिंग " समजेपर्यंत " बॅट्स्मन् " जपून खेळत असतो —
" बोलिंग " समजलें म्हणजे " स्कोअर "ला सुरुवात
— प्रथम टुक टुक " रन्स " नंतर " बाउंडरी ". —

उत्पादन-मित्रानें

(१) १९५२ च्या हंगामाचा तोटा भरून काढून सिंडिकेट पुन्हा नफ्यांत आणली.
(२) ठेवींचा ४२ वा लक्ष व्याजासह परत केला.

— उत्पादन-मित्र म्हणतो —

★ (१) सहा महिन्यांनीं व्याज व तीन वर्षांनीं ठेवींची रक्कम तारखेला परत अशी हमी घेण्याला सिंडिकेटचा उत्पादन-मित्र समर्थ आहे.
★ (२) मशिनरी व मशिनरीच्या उभारणीचें भांडवल लवकर जमावें यासाठीं एक वर्ष मुदतीच्या ठेवी घेतलया त्या परत करा.
★ (३) व्याजाचा फायदा सिंडिकेटच्या हितचिंतकांना मिळूं द्या.

## ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ ( सात ) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ ( सहा ) टक्के.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ पुणें २.
दि. २९-१२-१९५३

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंटस्.

प्रत- हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.